वर्ष : ०४ | अंक: २१ | मुंबई, मंगळवार १७ एप्रिल २०१८ ते २३ एप्रिल २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 सागरी किनारा रस्त्यास विलंब

3 → तोट्यातल्या गिरण्या

परप्रांतीय भाजीविक्रेत्यांसाठी मराठी शेतकऱ्यांना त्रास! ← 4

100% BIS हॉलमार्क ज्वेलरी

एम्. के. घारे ज्वेलर्स

नातं सोन्यापलीकडचं......१९३३ पासून

Right Time, Right Date, Right Investment
Auspicious Day to
Buy Gold

२५%* सोन्याच्या दागिन्यांच्या मजूरीवर सूट | ५०%* हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजूरीवर सूट

५ ते १८ एप्रिल,२०१८ पर्यंत

AkshaYa Tritiya

अक्षय्य तृतीया निमित्त दागिन्यांतील नवनिर्मित कलाकृती आपणासाठी आम्ही घेउन येत आहोत.

सोन्याचे दागिने | चांदीचे दागिने | नवग्रह | हिऱ्यांचे दागिने

नवग्रह खडयांच्या खरेदीवर १०% सूट

THE LEGACY OF 84 YEARS

परळ +91 22 2412 4749 | कांदिवली +91 22 2863 1255 | गोरेगाव +91 22 2873 7788 | विरार 0250 250 4688 | भांडुप +91 22 2594 5666 | बोरिवली +91 22 2848 1159 | मिरारोड +91 22 2810 6101

दुकान नं. ७/६, बिल्डिंग, अ-७, सेक्टर ६, शांती नगर, जैन मंदीर समोर, मिरारोड, ठाणे-401107. ☎ +91 22 2810 6101 | 02

# भाजप बलात्काऱ्यांच्या पाठीशी!

## राज ठाकरेंचा भाजपवर जोरदार शब्दांत हल्ला



**मुंबई - 'आठ वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार करणाऱ्या आरोपींच्या पाठिशी भाजपवाले उभे राहतात, हे भयानक आहे. साडेचार वर्षात काहीच करता न आल्यामुळे निवडणुकांसाठी सत्ताधाऱ्यांचा देशात जातीय दंगली भडकावण्याचा यामागे उद्योग दिसतो', असा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी केला. 'त्या चिमुरडीपासून देशाला धोका नव्हता. तुमच्यात हिंमत असेल तर या देशातील बांगलादेशी घुसखोर आणि पाकिस्तानींना हुसकावून दाखवा', असे आव्हानही राज ठाकरे यांनी दिले.**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे १०० महिलांना ऑटोरिक्षांचे राज ठाकरे यांच्या हस्ते मुलुंड येथे झालेल्या एका कार्यक्रमात वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. 'त्या आठ वर्षांच्या चिमुरडीवर घडलेला प्रसंग संतापजनक आहे. एका मेंढपाळाच्या त्या मुलीवरील अत्याचाराचा घटनाक्रम पाहिला तर संताप येतो. साडेचार वर्षात लोकांना सांगण्यासारखे यांच्याकडे काही नसल्यामुळे पुन्हा धर्माच्या नावावर मते घेण्यासाठी जातीय दंगली घडविण्याचा भाजपवाल्यांचा उद्योग दिसतो. पाकिस्तान हा शत्रू असल्याचे वारंवार सांगत आहात. मग पाकचे तत्कालीन पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या वाढदिवसाला केक कापायला कशासाठी गेला होतात?' असा सवाल राज यांनी पंतप्रधान मोदींना उद्देशून केला.

'देशभरात अनेक आंदोलने सुरू झाल्यावर पंतप्रधान म्हणतात की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे आपण पंतप्रधान झालो आहोत. हे पंतप्रधानपदाची शपथ घेताना का सांगितले नाही. ज्यावेळी बलात्कार होतो तेव्हा आरोपी हिंदू की मुस्लिम असे बघू नका. जो कोणी आरोपी असेल त्याला तिथल्या तिथे ठेचून काढा', असे राज ठाकरे म्हणाले.

### राज काय म्हणाले...

- एवढ्या वर्षानंतर आज मोदींना आठवतंय की बाबासाहेब आंबेडकरांमुळे मी पंतप्रधान झालो, जेव्हा पंतप्रधानपदाची शपथ घेतलीत तेव्हा नाही बाबासाहेब आठवले. सगळी प्रकरण अंगाशी आल्यावर यांना आता बाबासाहेब आठवताहेत.
- वर्षाला २ कोटी नवीन रोजगार देऊ असं म्हणणारे पंतप्रधान कुठे गेले? महाराष्ट्रात रोजगार तर मनसे निर्माण करत आहे.
- निर्भया प्रकरणी मनमोहन सिंग यांना बांगड्या पाठवणाऱ्या स्मृती इराणी आता गप्प का?
- मुख्यमंत्री म्हणतात की नाणार प्रकल्प कोकणात झाला नाही तर गुजरातला जाईल. गुजरातच का आठवतो मुख्यमंत्र्यांना? इतर राज्य नाहीत का?
- नाणार प्रकल्प कोकणात होऊ देणार नाही म्हणजे नाही.
- गेल्या ४ वर्षात काही करून दाखवता आलं नाही म्हणून हिंदू मुस्लिम दंगली भडकवायला निघालेत, हेच मी पाडव्याच्या सभेत बोललो होतो.
- २००८ च्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रेल्वे आंदोलनामुळेच त्या त्या राज्यात निर्माण होणाऱ्या नोकऱ्या या स्थानिकांना मिळाव्यात असा आदेश रेल्वे मंत्र्यांनी दिला. हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं यश आहे.

# बेस्ट, रेल्वे, मेट्रो, मोनोसाठी एकच तिकीट



**मुंबई** - बेस्ट, उपनगरीय रेल्वे, मेट्रो आणि मोनो या सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी एकच तिकीट व्यवस्थापन प्रणाली निर्माण करण्याच्या प्रस्तावास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार ही प्रणाली विकसित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निविदा प्रक्रियाही सुरू केली आहे. एकात्मिक तिकीट प्रणालीचे सर्व सोपस्कार पूर्ण करून येत्या दिवाळीच्या मुहूर्तावर लोकांना प्रत्यक्षात या योजनेचा लाभ देण्याचा प्राधिकरणचा प्रयत्न असल्याचे एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले. या योजनेसाठी रेल्वे आणि राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने एक विशेष उपकंपनी (एसपीव्ही) स्थापन करण्यात येणार असून त्यासाठी प्राधिकरणाने १३० कोटी रूपये उपलब्ध करून दिले आहेत.

मुंबईत सध्या मध्य, पश्चिम, हार्बर आणि ट्रान्स हार्बरच्या माध्यमातून उपनगरीय रेल्वे, वर्सोवा- घाटकोपर दरम्यान धावणारी रिलायन्सची मेट्रो, वडाळा- चेंबूर आणि आता सातरस्त्यापर्यंत धावणारी एमएमआरडीची मोनोरेल तसेच बेस्ट सोबतच ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली आदी परिवहन सेवांच्या माध्यमातून दररोज सुमारे एक कोटी २५ लाख लोक प्रवास करतात. महानगर प्रदेशातील वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी प्राधिकरणाच्या माध्यमातून दहिसर ते अंधेरी,कुलाबा- सिप्झ, वडाळा- ठाणे असे आणखी काही मेट्रो मार्ग हाती घेण्यात आले असून पुढील काही वर्षांनी याही मार्गावर मेट्रो धावू लागणार आहेत.मेट्रोतूनच दररोज ८० लाख प्रवाशी प्रवास करण्याची अपेक्षा आहे. सध्या मात्र सर्व परिवन सेवा आणि रेल्वे, मेट्रो यांची तिकीट प्रणाली वेगवेगळी असल्याने प्रवाशांना नाहक त्रास होतो. त्यामुळे या सर्वासाठी एकच तिकीट प्रणाली लागू करण्याचा निणऱ्य सरकारने घेतला असून त्याची सर्व जबाबदारी एमएमआरडीएवर सोपविण्यात आली आहे.

# यवतमाळमध्ये वीज कोसळून चौघांचा मृत्यू, ४ जण जखमी

सोलापूर जिल्ह्यातही वीज कोसळून एकाचा मृत्यू झाला. अक्कलकोट तालुक्यातील चिंचोली (न) रविवारी दुपारी चारच्या सुमारास विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला. पाऊस आल्याने झाडाखाली थांबलेल्यांवर वीज कोसळल्यामुळे चार जण ठार तर चौघे जखमी झाले. ही घटना यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील वाकोडी शिवारात घडली. जखमींपैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे.

महागाव तालुक्यातील वाकोडी शिवारात रविवारी दुपारी ढगांच्या गडगडाटासह पाऊस कोसळण्यास सुरूवात झाली. त्यावेळी तेथून जात असलेल्या काही ग्रामस्थांनी पावसापासून बचावासाठी झाडाखाली आसरा घेतला. पण दुर्दैवाने ते सर्वजण ज्या झाडाखाली उभे होते, तिथेच वीज कोसळली. यात चौघांचा जागीच मृत्यू झाला तर चौघे जखमी झाले. जखमींवर रूग्णालयात उपचार सुरू असून त्यातील दोघांची प्रकृती गंभीर आहे. तालुक्यात अवकाळी पावसाने कहर केला असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

# खुशखबर! यंदा समाधानकारक पाऊस होणार



**नवी दिल्ली :** देशातल्या बळीराजाचे ज्याकडे डोळे लागले आहेत, तो मान्सून यंदा समाधानकारक होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. सरासरीच्या ९७ टक्के मान्सून होणार असा अंदाज हवामान खात्याचे महासंचालक के. जे. रमेश यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केला. तसेच देशावर यंदा दुष्काळाचे सावटही नसल्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. नैऋत्य मोसमी पाऊस दरवर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीत होतो. या पावसाविषयीचा प्राथमिक अंदाज दरवर्षी एप्रिलमध्ये भारतीय हवामान खात्याकडून जाहीर होत असतो. पावसाबाबतचा हा प्राथमिक अंदाज दिलासादायक आहे.


# मराठी एकीकरण समितीवर कार्याध्यक्ष म्हणून प्रदीप सामंत यांची निवड



दिनांक १४.०४.२०१८ रोजी झालेल्या मराठी एकीकरण समिती महाराष्ट्र राज्य च्या बैठकीमध्ये मराठी संस्कृती संवर्धन व मराठी शाळा वाचवण्यासाठी तसेच सर्व पक्षीय मराठी माणसाने राजकीय मतभेद बाजूला ठेवून महाराष्ट्र च्या अस्तित्वासाठी, मराठी अस्मितेसाठी

उर्वरित पृष्ठ 2 वर

## सौजन्य व्हॉट्सअप



# आश्रय ट्रस्टतर्फे कुळयेवाडी विकास मंडळाच्या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा





आश्रय ट्रस्टतर्फे कुळयेवाडी विकास मंडळाच्या स्मरणिकेचे प्रकाशन रविवार दिनांक १५.०४.२०१८ रोजी सायंकाळी भोलेनाथ मंदीर, भाईंदर पुर्व च्या परिसरात संपन्न झाला. स्मरणिकेचे प्रकाशन आश्रय ट्रस्टचे संस्थापक श्री. दिपक मोरेश्वर नाईक व सौ. प्रिती दिपक नाईक तसेच श्री. रवि सोडा यांच्या हस्ते करण्यात आले. दिनांक २८ एप्रिल २०१८ पासून एक सप्ताह रत्नागिरी जिल्हयात गुहागर तालूक्यात कुळयेवाडी या विकास मंडळाचा ५० वा वर्धापन दिन साजरा करण्यात

उर्वरित पृष्ठ 2 वर

# 'चाय पे चर्चा' वगैरे करून पाकड्यांचे वाकडे शेपूट सरळ होणार नाही



**मुंबई- पाकिस्तानकडून वारंवार होणा-या शस्त्रसंधी उल्लंघनावरुन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला असून 'चाय पे चर्चा' वगैरे करून पाकड्यांचे वाकडे शेपूट सरळ होणार नाही असं म्हटलं आहे. उद्धव ठाकरे यांनी मोदी सरकारवर टीका केली असून केंद्रात बसलेले सत्ताधारी पाकिस्तानी राज्यकर्त्यांना चोख उत्तर कधी देणार हा खरा प्रश्न आहे अशी विचारणाही केली आहे. सीमेपलीकडून पाकिस्तानी सैन्याने बुधवारी पुन्हा एकदा गोळीबार केला. त्यात महाराष्ट्रातील संभाजीनगरचे जवान किरण थोरात शहीद झाले होते. उद्धव ठाकरे यांनी जवान शहीद होत असल्याने सामना संपादकीयमधून संताप व्यक्त केला.**

किती दिवस पाकड्यांचा हा मस्तवालपणा आपण सहन करणार आहोत? आमच्या सैनिकांनी शस्त्रसंधीचे सर्व नियम पाळायचे. कोणतीही कुरापत काढायची नाही. पाकिस्तानने मात्र त्यांच्या मनात येईल तेव्हा शस्त्रसंधीचे बंधन एकतर्फी झुगारून द्यायचे, गोळीबाराच्या फैरी झाडायच्या. पुन्हा हिंदुस्थानी सैनिकांच्या चौक्यांबरोबरच नागरी वस्त्यांनाही सोडायचे नाही. निरपराध नागरिकांचे बळी घ्यायचे. पाकिस्तानच्या या कुरापतींना आपले जवान चोख प्रत्युत्तर देतात हे खरे असले तरी केंद्रात बसलेले सत्ताधारी पाकिस्तानी राज्यकर्त्यांना चोख उत्तर कधी देणार हा खरा प्रश्न आहे असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. चोख उत्तर दिले जात नाही तोपर्यंत जवान आणि निरपराध नागरिकांच्या रक्ताने प्रत्यक्ष नियंत्रण रेषा 'लाल' होतच राहील. पाकिस्तान शस्त्रसंधी पाळत नाही, सीमेवर गोळीबार करतो, जम्मू-कश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले घडवतो. हिंदुस्थानी लष्कराच्या जवानांविरोधात स्थानिक नागरिकांना भडकवतो. महाविद्यालयांतील तरुण-तरुणींना सैनिकांवर दगडफेक करायला लावतो. हिंदुस्थानी सैन्याने मागील वर्ष-सवा वर्षात दीडशेपेक्षा जास्त दहशतवाद्यांचा जम्मू-कश्मीरमध्ये खात्मा केला हे खरे असले तरी सीमेवर पाकिस्तान आणि जम्मू-कश्मीरमध्ये दहशतवादी यांचा उच्छाद सुरूच आहे असं उद्धव ठाकरे बोलले आहे. त्यात सीमावर्ती गावांमधील नागरिकांसाठी 'बंकर्स' बांधण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पाकिस्तानने जम्मू-कश्मीर सीमा 'युद्धक्षेत्र' बनवले आहे असाच त्याचा अर्थ प्रामुख्याने ज्या राजौरी, पूंछ, कठुआ भागांत जवळजवळ १३ हजार बंकर्स बांधले जाणार आहेत. नागरिकांच्या सुरक्षेसाठी हे ठीक आहे, पण पाकिस्तान शस्त्रसंधीची जी सर्रास विटंबना करीत आहे ती पूर्णपणे थांबवणे हाच सीमेवरील शांतता आणि सुव्यवस्थेचा खरा उपाय आहे.

## मुंबई ते पुणे मार्गावर सर्वेक्षणासाठी ड्रोनचा वापर

### मान्सूनपूर्व तयारीसाठी मध्य रेल्वेची तयारी

**मुंबई-** पावसाळ्यात मुंबई ते पुणे मार्गावर रुळांवर साचणारे पाणी, कर्जत ते पुणे पट्ट्यात असणाऱ्या डोंगरदऱ्यांमुळे दरडी कोसळण्याचा असलेला धोका पाहता या संपूर्ण भागाचे सर्वेक्षण करून योग्य उपाययोजना मध्य रेल्वेकडून केल्या जाणार आहेत. सर्वेक्षणासाठी ड्रोनचा वापर केला जाणार असून त्यासाठी पोलिसांची परवानगीदेखील मागण्यात आली असल्याची माहिती मध्य रेल्वेकडून देण्यात आली. दरवर्षी पावसाळ्यात रुळांवर पाणी साचल्याने मध्य रेल्वेची उपनगरीय रेल्वे सेवा पूर्णपणे कोलमडते. तर कर्जत ते पुणे या पट्ट्यात असणाऱ्या डोंगरदऱ्यांमुळे रुळांवर दरडीही कोसळतात. मध्य रेल्वेकडून यासाठी प्रत्येक वर्षी यशस्वीरीत्या मान्सूनपूर्व तयारी केल्याचा दावा केला जातो. मात्र हा दावा फोलच ठरतो. नालेसफाई करतानाच कचरा उपसून काढणे, पाणी उपसण्यासाठी पंप मशीन बसविणे इत्यादी कामे केली जातात. मात्र या कामांचे योग्य नियोजन करता यावे आणि रेल्वे सुरळीत सुरू राहावी यासाठी मुंबई ते पुणे मार्गावर सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर केला जाणार आहे. ड्रोनचा वापर करण्यासाठी



पोलिसांची परवानगी मागण्यात आली आहे. ड्रोन हे भाड्याने घेण्यात येणार असून त्यासाठी प्रति किमी तीन ते पाच हजार रुपये भाडे देण्यात येईल. डोंगरदरी भागातील धोकादायक खडकांचे स्कॅनिंग करणे, खडकांवरील तडे शोधून काढणे, पाणी साचणारे सखल भाग टिपणे इत्यादी कामे ड्रोन कॅमेऱ्यांमार्फत करतानाच उपाययोजना केल्या जाणार आहेत.

## सागरी किनारा रस्त्यास विलंब

### प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचा प्रस्ताव रेंगाळला; स्थायी समितीच्या मंजुरीची प्रतीक्षा


**मुंबई-** मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाच्या दक्षिण बाजूच्या तीन टप्प्यांच्या कामांसाठी स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती करण्यासाठी प्रशासनाने मार्च महिन्यात स्थायी समितीत प्रस्ताव सादर केला होता. मात्र पालिकेत शिवसेना सत्तेवर असतानाही या प्रस्तावाला स्थायी समितीची मंजुरी मिळू शकलेली नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे यांचे मुंबई किनारा रस्ता मार्गाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यास विलंब होत आहे. मुंबईमधील वाहतुकीला गती देण्यासाठी नरिमन पॉइंट ते कांदिवली दरम्यान २९.२० कि.मी. लांबीचा मुंबई किनारा रस्ता प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून हा प्रकल्प उभारणे उद्धव ठाकरे यांचे स्वप्न आहे. हा प्रकल्प मरिन ड्राइव्ह उड्डाणपूल ते वांद्रे वरळी सेतूचे टोक आणि वांद्रे वरळी सेतूच्या टोकापासून कांदिवली लिंक रोड अशा दोन टप्प्यांमध्ये उभारण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते प्रियदर्शनी उद्यान, प्रियदर्शनी उद्यान ते बडोदा पॅलेस आणि बडोदा पॅलेस ते वांद्रे वरळी सागरी सेतूचे टोक अशा तीन भागांत या प्रकल्पाचे काम करण्यात येणार आहे. या तीन भागांसाठी तीन स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून त्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मार्च महिन्यात स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर केला होता.



## गर्दीच्या वेळीच गोरेगावहून हार्बर नाही

**मुंबई** - हार्बर मार्गाचा पश्चिम रेल्वेवर विस्तार करत तो गोरेगावपर्यंत नेण्यात आल्यामुळे रेल्वे उपनगरीय प्रवाशांना दिलासा मिळाला असला, तरी सकाळी गर्दीच्या वेळी गोरेगाव येथून मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाण्यासाठी लोकल सुरू करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रवाशांना अजूनही आधीच्या मार्गानेच प्रवास करावा लागत असून हार्बर विस्ताराचा काहीच फायदा नाही, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

गोरेगाव येथून सीएसएमटी हार्बर सेवा सुरू झाल्याने या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र प्रत्यक्षात सेवा सुरू झाल्यावर सकाळी ९



पूर्वी एकही फेरी उपलब्ध नसल्याचे उमगताच प्रवाशांमध्ये नाराजी पसरली आहे. हार्बरचा गोरेगावपर्यंत विस्तार झाल्याने या मार्गावरील १४ हजार प्रवाशांना फायदा होईल, असा रेल्वेचा दावा होता. मात्र, सकाळी या मार्गावर लोकल नसल्याने हा दावा फोल ठरत आहे. पश्चिम उपनगरांतून शेकडो प्रवासी दररोज कामानिमित्त मशीद बंदर, सीएसएमटी या भागांत जात असतात. मात्र, या प्रवाशांना आजही दोन गाड्या बदलूनच प्रवास पूर्ण करावा लागत आहे.

गोरेगाव-सीएसएमटी मार्गावर एकूण ४९ फेऱ्या चालविण्यात येतात. यातील अधिक फेऱ्या दुपारच्या वेळेत चालविण्यात येतात. यामुळे यातील काही फेऱ्या सकाळच्या वर्दळीच्या वेळी चालविण्यात याव्यात, अशी मागणी या मार्गावरील प्रवाशांकडून होत आहे. तसेच गाडीच्या फेऱ्यांचे वेळापत्रक अद्याप प्रवाशांना माहीत नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे.

## बॅनरबाजीला आळा?



**मुंबई** - 'भाऊंना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा, अमूक पदावर नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन, कार्यसम्राट आमदारांच्या निधीतून शेड बांधण्यात आल्याबद्दल आभार, धडाडीच्या नगरसेवकांच्या निधीतून लादीचे काम करण्यात आले, ष्ठआमच्या क्लासच्या मुलांचे दहावीत सुयश... अशाप्रकारच्या बॅनरबाजीला आता आळा बसण्याची चिन्हे आहेत. प्लास्टिकबंदीमध्ये फ्लेक्स, बॅनर्स, तोरण आणि झेंड्याचा समावेश करण्यात आल्यामुळे शहर विद्रूप करणारी ही बॅनरबाजी खरोखरच थांबणार का, याविषयी उत्सुकता आहे. विशेष करून राजकीय पक्षांची बॅनरबाजी बंद होणार, का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र फ्लेक्स आणि बॅनर उत्पादनबंदीबाबत आम्हाला कोणत्याही प्रकारचे आदेश आलेले नाहीत, असे उत्पादकांचे म्हणणे आहे.

सरकारने काढलेल्या आदेशात प्लास्टिकपासून फ्लेक्स, बॅनर्स, तोरण आणि ध्वज इत्यादींचे उत्पादन, वापर, वितरण आणि विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर राजकीय पक्षांवर अवलंबून असणाऱ्या या उद्योगाचे काय होणार असाही प्रश्न आहे. गेल्या काही वर्षांपासून फ्लेक्स आणि बॅनर उद्योग कमालीचा भरभराटीला आला आहे. फक्त निवडणुकीच्या काळात होणारी बॅनरबाजी आता कोणत्याही दिवशी दिसून येऊ लागली आहे. सणासुदीच्या शुभेच्छापांसून ते अगदी विभागातील फूटकळ नियुक्त्या असोत, बॅनरबाजीशिवाय कुणी स्वस्थ बसल्याचे दिसत नाही. त्यामुळे सगळकडेच बॅनरबाजीला ऊत आला आहे.

## प्लास्टीक बाटल्या वापरणाऱ्यांना मुदतवाढीचा दिलासा का नाही?

**मुंबई-** प्लास्टिक आणि थर्माकोल उत्पादकांचे म्हणणे ऐकण्याची तसेच त्यानुसार निर्णयात सुधारणा करण्याची तयारी बुधवारच्या सुनावणीत दाखवणाऱ्या राज्य सरकारने त्यादृष्टीने जराही वेळ न दवडता प्लास्टिक आणि थर्माकोल बंदीबाबतच्या अधिसूचनेत तत्परतेने सुधारणा केली. त्यानुसार प्लास्टिकच्या बाटल्यांवर पुनर्प्रक्रिया करण्यासाठी वा अस्तित्वात असलेल्या मालाची विल्हेवाट लावण्यासाठी उत्पादकांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली असून गुरूवारी उच्च न्यायालयाला त्याची माहिती सरकारतर्फे देण्यात आली. परंतु प्लास्टिक बाटल्या उत्पादकांना तीन महिन्यांच्या मुदतवाढीचा दिलासा देताना या बाटल्या वापणाऱ्यांनाही असाच दिलासा (दंडात्मक कारवाईबाबत) का दिलेला नाही, अशी विचारणा करत न्यायालयाने सरकारच्या या निर्णयाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले. प्लास्टिक आणि थर्माकोल बंदीचा अंतिम निर्णय घेण्याआधी लोकांकडून त्यावर सूचना आणि हरकती मागवण्यात येतील याबाबतचे हमीपत्र सरकारने न्यायालयात दिले होते. मात्र त्याकडे काणाडोळा करत तसेच आवश्यक त्या नियमांचे पालन



न करताच सरकारने ही बंदी लागू केल्याचा आरोप करत राज्यभरातील प्लास्टिक आणि थमाकोल उत्पादक संघटनांनीन्यायालयात धाव घेतली आहे. न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या खंडपीठासमोर गेल्या दोन दिवसांपासून या प्रकरणी सुनावणी सुरू आहे. गुरूवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी प्लास्टिक आणि थर्माकोल बंदीबाबतच्या अधिसूचनेत सुधारणा करण्यात आल्याची माहिती राज्य सरकारतर्फे वरिष्ठ वकील ई. पी. भरूचा यांनी न्यायालयाला दिली. या सुधारित अधिसूचनेनुसार प्लास्टिक बाटल्या उत्पादकांनी बाटल्यांवर पुनर्प्रक्रिया करणारे 'रिव्हर्स वेंडिंग मशिन्स बसवावे वा पुनर्प्रक्रिया करणाऱ्यांसोबत करार करण्याची अट घालत प्लास्टिक बाटल्यांवरील बंदी उठवली. शिवाय बाटल्यांचा दर्जा कसा असेल याबाबतही अटी घालण्यात आलेल्या आहेत. तसेच अस्तित्वात असलेल्या बाटल्यांची विल्हेवाट लावण्यासाठी उत्पादकांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. सरकारने दिलेल्या या माहितीनंतर पास्टिक बाटल्या उत्पादकांप्रमाणे त्यांचा वापर करणाऱ्या लोकांनाही मुदतवाढीचा दिलासा दिला आहे का, अशी विचारणा न्यायालयाने सरकारकडे केली.

## तीन महिन्यांत लावा प्लॅस्टिकची विल्हेवाट





**मुंबई :** प्लॅस्टिक बंदीसंबंधी राज्य सरकारने २३ मार्च रोजी काढलेल्या अधिसूचनेला स्थगिती देण्यास उच्च न्यायालयाने शुक्रवारी नकार दिला. या निर्णयामुळे प्लॅस्टिक उत्पादक व विक्रेत्यांना मोठा झटका बसला आहे. प्लॅस्टिकच्या वस्तूंची विल्हेवाट लावण्यासाठी न्यायालयाने तीन महिन्यांची मुदत दिली आहे.

राज्य सरकारने २३ मार्च रोजी अधिसूचनेद्वारे प्लॅस्टिकचे उत्पादन, साठा, विक्री व वापर करण्यास बंदी घातली. या बंदीला महाराष्ट्र प्लॅस्टिक उत्पादक संघटना व काही विक्रेत्यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सरकारने उत्पादक व विक्रेत्यांची बाजू न ऐकताच ही अधिसूचना काढली असून ती केंद्राच्या 'पर्यावरण संरक्षण कायद्या'शी विसंगत असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे होते.

राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाला बंदी घालण्याचा अधिकारच नाही. त्यामुळे अधिसूचनेला स्थगिती द्यावी, अशी विनंती याचिकाकर्त्यांनी केली होती. मात्र, सरकारने योग्य प्रकारे अधिकाराचा वापर केला. याबद्दल सरकारने दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक आहे, असे सांगत न्यायालयाने स्थगिती नाकारली.

***तोपर्यंत दंडात्मक कारवाई करू नका***

नागरिकांकडे असलेल्या प्लॅस्टिकच्या वस्तूंची विल्हेवाट लावण्यास सरकारने एक महिन्याची मुदत दिली होती. मात्र एक महिना पुरेसा नाही. त्यामुळे तीन महिन्यांचा अवधी द्यावा आणि या काळात त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करू नये, असे निर्देश न्यायालयाने राज्य सरकारला दिले.

***राज्यातील लोकांचे आरोग्य अधिक महत्त्वाचे***

प्लॅस्टिक उत्पादकांना होणाऱ्या नुकसानाची आम्हाला जाणीव आहे. मात्र प्लॅस्टिकच्या कचड्यामुळे पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यावर होणारे विपरीत परिणामही लक्षात घेतले पाहिजेत. त्यामुळे राज्य सरकारने घातलेल्या बंदीमुळे याचिकाकर्त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे, असे आम्हाला वाटत नाही,' असे म्हणत उच्च न्यायालयाने राज्य सरकारचा प्लॅस्टिक बंदीचा निर्णय योग्य ठरवला.

पृष्ठ १ वरुन

## मराठी एकीकरण समितीवर कार्याध्यक्ष म्हणून प्रदीप सामंत यांची निवड

एकत्र येऊन कार्य करण्यासाठी तसेच मराठी बांधवांना एकत्र जोडण्यासाठी श्री. प्रमोद सामंत यांची सर्वानुमते कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित कार्याध्यक्ष श्री. प्रदीप सामंत यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी लवकरच संघटनेचा नियम व अटीच्या अधीन राहून मराठी भाषा, मराठी शाळा, मराठी माणसाच्या हक्कासाठी योगदान देऊन व सर्व जिल्हयाजिल्हयात फिरु न मराठी एकीकरण बद्दल कार्यशाळा घेऊन मराठीचा दर्जा वाढवू , यासाठी मी वचनबद्ध राहीन असे सांगितले.

## आश्रय ट्रस्टतर्फे कुळयेवाडी विकास मंडळाच्या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

येणार आहे. सदर वर्धापन दिनामध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यामध्ये आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टद्वारे मोफत आरोग्य तपासणी शिबीर व उपचार तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया व चष्मावाटप करण्यात येणार आहे. मोबाईलचा वापर कमी करुन मैदानी खेळ मुलांनी जास्त प्रमाणात खेळावे यासाठी ३६ गावातून तरुण मुलांचे मंडळ क्रिकेटचे सामने खेळण्यासाठी या गावी येणार आहेत. यासाठी मोठ्या प्रमाणात क्रिकेटचे सामने घेऊन उत्कृष्ट बक्षिसे देण्यात येणार आहे. व सर्व खेळाडूंना आश्रय ट्रस्ट चे प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. ग्रामीण शाळेला आश्रय ट्रस्टतर्फे संगणक देण्यात येणार आहे. विरंगुळा म्हणून नेत्रहिन अशा कलाकारांचे वादयवृंद येथे आयोजित करण्यात आला आहे. अशाप्रकारचे विविध कार्यक्रम सुचि स्मरणिकेद्वारे प्रकाशित करण्यासाठी सदर कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये भोलेनाथ मंदीर ट्रस्ट चे श्री. रवि सोडा व सर्व ट्रस्टी, पोलिस बातमीचे सर्व पत्रकार विनोद मेढे , संजय लाड , किशोर मुल्या, प्रविण सुर्वे, अनिल मेहता, सागर परब , सौ. अश्विनी नाईक परब, दिवाकर परब तसेच सर्व कुळयेवाडी ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

## कणकवलीमध्ये राणेंचा भाजपला दे धक्का; गुहागरात अपक्ष जोरात

मुंबई - राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या सहा नगरपालिकांच्या निवडणुकीत भाजपने बाजी मारून आपणच नंबर वन असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. दरम्यान राज्याचे लक्ष लागलेली कणकवली नगरपंचायत नारायण राणे यांच्या महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाने खिशात टाकली. विशेष म्हणजे ज्या भाजपच्या कोट्यातून नारायण राणे खासदार झाले त्यांनीच या निवडणुकीत भाजप-शिवसेनेचा दारूण पराभव करत भाजपला एकप्रकारे वेगळाच धक्का दिला. कहर म्हणजे महाराष्ट्र स्वाभिमानने राष्ट्रवादी काँग्रेसशी आघाडी करून ही निवडणूक लढवली होती.

## ग्रॅच्युइटी विलंबावर व्याज



**मुंबई - तीन दशकांपूर्वीच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात निदीष सुटल्यानंतर एका माजी उपजिल्हाधिकाऱ्याला ग्रॅच्युइटीची रक्कम विलंबाने मिळाली खरी; मात्र राज्य सरकारने या विलंबाबद्दल सेवानिवृत्तीची तारीख लक्षात न घेता न्यायालयीन निकालाच्या तारखेपासूनच्या अवघ्या दोन वर्षासाठीच व्याजाची रक्कम दिली. त्यामुळे याप्रश्नी माजी अधिकाऱ्याने मुंबई उच्च न्यायालयापर्यत लढा दिला आणि अखेर तो यशस्वी झाला.**

उच्च न्यायालयाने त्याला सेवानिवृत्तीच्या तारखेपासूनच्या विलंबाबद्दल व्याजाची रक्कम देण्याचा आदेश सरकारला दिला असल्याने सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हा महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. विनोदकुमार दीक्षित सन १९८४मध्ये उप जिल्हाधिकारी पदावर कार्यरत असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला होता आणि त्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा नोंदवण्यात आला होता. याविषयीचा खटला प्रलंबित असतानाच ते १ एप्रिल, १९९७ रोजी सेवानिवृत्त झाले. २६ जून, २००९ रोजी कल्याण सत्र न्यायालयाने सुनावणीअंती दीक्षित यांना भ्रष्टाचाराच्या आरोपांतून निर्दोष मुक्त केले. त्यानंतर जवळपास सव्वादोन वर्षांनी राज्य सरकारने त्यांची रोखून ठेवलेली ग्रॅच्युइटीची आणि वेतनवाढीची रक्कम दिली. याचबरोबर न्यायालयीन निकालाच्या तारखेपासूनच्या विलंबाबद्दल ग्रॅच्युइटीवरील रकमेवर व्याज म्हणून ३६ हजार २१ रुपये दिले. मात्र, व्याजाची रक्कम ही सेवानिवृत्तीच्या म्हणजेच १ एप्रिल १९९७पासूनच्या कालावधीसाठी मिळायला हवी, असा दीक्षित यांचा आग्रह होता. त्यामुळे त्यांनी याप्रश्नी महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणासमोर (मॅट) अर्ज केला होता. मात्र, ग्रॅच्युइटीविषयीचे नियम आणि सरकारी 'जीआर'च्या आधारे दीक्षित यांनी केलेला युक्तिवाद अमान्य करत 'मॅट'ने त्यांचा अर्ज फेटाळून लावला. त्यामुळे दीक्षित यांनी ॲड. शैलेंद्र पेंडसे यांच्यामार्फत 'मॅट'च्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले.

# संपादकीय... तोट्यातल्या गिरण्या


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

विदर्भातून मोठ्या प्रमाणात कापसाचा पुरवठा होत असल्याने, राज्यातल्या वस्त्रोद्योगाला चालना द्यायसाठी तीस वर्षापूर्वी सहकारी सूत गिरण्यांना प्रोत्साहन द्यायच्या धोरणाची अंमलबजावणी केली. सहकारी योजनांचा लाभ घ्यायसाठी किलोभर कापसाचे उत्पादनही होत नसलेल्या भागातही सहकारी सूत गिरण्यांची नोंदणी आणि उभारणी करायचा सपाटा सहकार सम्राटांनी लावला. या सूत गिरण्यांद्वारे उत्पादित होणाऱ्या सूताचा पुरवठा इचलकरंजी, सोलापूर, भिवंडी या भागातल्या यंत्रमागांना होईल, सूताला आणि पर्यायाने कापसाला चांगला भाव मिळेल, असा दावा तेव्हाच्या काँग्रेस सरकारने केला होता. पण प्रत्यक्षात मात्र या सूत गिरण्या म्हणजे सरकारच्या दृष्टीने पांढरे हत्तीच ठरले. त्यांचा उपयोग काही कापूस उत्पादक शेतकरी, यंत्रमागधारक आणि कापड उद्योगालाही फारसा झाला नाही. परिणामी राज्यात मंजुरी मिळालेल्या २८१ सहकारी सूत गिरण्यातील १७३ सूत गिरण्या कशा बशा सुरू झाल्या. बाकीच्या शंभरवर सूत गिरण्यांसाठी सरकारने दिलेले शेकडो कोटी रुपयांचे भाग भांडवल, सहकारमहर्षींनी जनतेकडून भागभांडवल आणि बँकांकडून कर्जे काढून सूत गिरण्यांच्या इमारती बांधून घेतल्या. पण, प्रत्यक्षात मात्र या सूत गिरण्या सुरूही झाल्या नाहीत. बहुतांश सूत गिरण्यात सूतकताईची यंत्रसामुग्रीही आली नाही. परिणामी दक्षिण आणि पश्चिम महाराष्ट्रातल्या अशा बहुतांश सहकारी सूत गिरण्यांच्या इमारती गेली अनेक वर्षे मोकळ्याच पडलेल्या आहेत. २००८ मध्ये सुरू असलेल्या १७३ सूत गिरण्यांपैकी फक्त ५२ गिरण्यात सूताचे उत्पादन सुरू होते आणि तेव्हाही त्यातल्या ५० सूत गिरण्या तोट्यात होत्या आणि त्यांचा तोटा १३२ कोटी रुपयांचा होता. तोट्यातल्या या पन्नास सहकारी सूत गिरण्या विदर्भातल्याच म्हणजे कापूस उत्पादक भागातल्याच आहेत. तरीही त्यांना नफा काही मिळवता आलेला नाही. आता या गिरण्यांचा तोटा १९७० कोटी रुपयांवर गेल्यामुळे त्या आता बंद पडण्याच्या मार्गावरच आहेत. सध्या सुरू असलेल्या ६७ सूत गिरण्यातील बहुतांश सूत गिरण्या तोट्यातच असल्याने, या वाढत्या तोट्यातल्या सूत गिरण्या सुरू ठेवायसाठी सरकारला पुन्हा आर्थिक सहाय्य करावे लागेल. फक्त चारच सूत गिरण्या सध्या नफ्यात सुरू आहेत. सहकारी सूत गिरण्यांना मंजुरी आणि भागभांडवल द्यायचे काँग्रेस सरकारचे धोरणच मुळात वस्त्रोद्योग आणि कापूस उत्पादकांना प्रोत्साहन द्यायच्या ऐवजी सहकार महर्षींना त्यांच्या नव्या साम्राज्यासाठी सरकारी आर्थिक मदत देणे असेच असल्याने राज्यातल्या सहकारी सूत गिरण्यांच्या नियोजनाचा अपेक्षेप्रमाणेच फज्जा उडवला आणि सुरू झालेल्या आणि नंतर तोट्यात गेलेल्या अनेक सहकारी सूत गिरण्या बंद पडल्या. या कर्जबाजारी सूत गिरण्या दिवाळखोरीत काढल्या गेल्या. ज्या सूत गिरण्या सुरू होत्या, त्यांच्या सूताला मागणी असली, तरी कापसाची खरेदी आणि सूताला मिळणारी किंमत यात सातत्याने तफावत पडत गेल्याने गिरण्यांचा तोटा वाढत गेला. खेळत्या भांडवलाच्याअभावी या गिरण्यांचा कारभार ठप्प झाला. काही गिरण्यांनी तर महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून घेतलेल्या विजेची बिलेही थकवली. परिणामी मंडळाने विजेचा पुरवठा तोडला आणि या गिरण्या बंद पडल्या. महाराष्ट्राच्या ज्या दुष्काळी भागात जनतेला पिण्याचे पाणी टँकरने पुरवावे लागते, अशा भागातही काँग्रेसच्या सरकारांनी आपल्या मर्जीतल्या नेत्यांना सहकारी साखर कारखाने मंजूर केले होते. परिणामी महाराष्ट्र डोंगराळ आणि दुष्काळी भागातही सहकारी साखर कारखान्यांचे पेव फुटले. साखर कारखान्यांचा गळीत हंगाम चालवायसाठी, पाणी टंचाईग्रस्त-दुष्काळी भागात पुरेसा ऊस नसल्याने १००-२०० किलो मीटर अंतरावरून उसाची वाहतूक करून सहकारी साखर कारखाने चालवले गेले. दुष्काळी भागातल्या सहकारी साखर कारखान्यांचा आर्थिक कारभारही उधळपट्टीचा आणि बेपर्वाईचा असल्याने राज्यातले असे अनेक सहकारी साखर कारखाने आर्थिक संकटात सापडले. बंद पडले आणि नंतर दिवाळ्यात निघाले. सहकारी सूत गिरण्यांच्याबाबतही नेमके असेच चुकीचे धोरण स्वीकारून ते अंमलात आणले गेले. या सहकारी सूत गिरण्यांना राज्य आणि केंद्र सरकारकडून मिळणारे अनुदान, हेच सहकारमहर्षींचे आकर्षण होते. अनुदान मिळाले आणि ते संपले. सरकारचे हजारो कोटी रुपयांचे भाग भांडवलही याच बंद पडलेल्या सूत गिरण्यात अडकून राहिले. लोकांच्याकडून जमवलेले हजारो कोटी रुपयांचे भाग भांडवलही असेच अडकले आहे. आता ज्या सूत गिरण्यांची विक्री झाली, त्या गिरण्यांच्या सभासदांचे शेकडो कोटी रुपयांचे भागभांडवल बुडाले. बंद पडलेल्या आणि विक्री झालेल्या राज्यातल्या सहकारी साखर कारखान्यात सरकारने आणि सभासदांनी गुंतवलेल्या हजारो कोटी रुपयांच्या भाग भांडवलाचीही अशीच अवस्था झाली. विदर्भातून सातआठशे किलोमीटर अंतरावरून कापूस विकत घेऊन, त्याची वाहतूक करून सूत गिरण्यात आणायसाठी होणारा भाडेखर्च तेव्हा सरकारनेही पश्चिम महाराष्ट्रातल्या सूत गिरण्यांना मंजुरी देताना विचारात घेतला नव्हता. राजकीय सोयीसाठी या सूत गिरण्यांना मंजुरी आणि नंतर भांडवलाचा पुरवठा सरकारने केला होता. वास्तविक विदर्भ, मराठवाड्यात कापसाचे उत्पादन होत असल्याने त्याच भागात सहकारी सूत गिरण्यांची उभारणी होणे शेतकरी आणि नियोजनाच्या दृष्टीनेही योग्य होते. पश्चिम महाराष्ट्रातल्या सहकारी सूत गिरण्यांना सरकारने मंजुरी दिली तेव्हा विदर्भातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी त्या धोरणाला विरोधही केला होता. पण, सरकारने तो जुमानला नाही. परिणामी सूत गिरण्यांचे हे नवे प्रक्रिया उद्योग सरकारला आर्थिक खड्डयात घालणारे ठरले. कापूस पिकत नसलेल्या भागात सूत गिरण्या उभारणाऱ्या काँग्रेस सरकारचे हे नियोजन कुणाच्याही हिताचे ठरले नाही. उलट ते कापूस उत्पादक शेतकरी, सरकार आणि वित्तीय संस्थांसाठी आतबट्ट्याचे ठरले. सहकारी सूत गिरण्या विदर्भातल्या शेतकरी आणि पणन संस्थांच्याकडून कापसाची खरेदीही पूर्ण करीत नसल्याचेही महालेखापालांनी केलेल्या लेखापरीक्षणात उघड झाले आहे. नियोजनाचे असे दिवाळे कढणारी सरकारे महाराष्ट्रात सत्तेवर होती. त्यामुळेच कापूस उत्पादक शेतकरी आणि सहकारी सूत गिरण्यांचे सभासद शेतकरीही असे आर्थिक संकटात सापडले. नियोजन कसे नसावे, याचे महाराष्ट्रातल्या बहुतांश तोट्यात चालणाऱ्या सहकारी सूत गिरण्या हे उत्तम उदाहरण ठरावे.

# मूलनिवासी: येथे आणि तेथे!

**युरोपीय वसाहतवाद्यांनी १५व्या व १६व्या शतकात जगातील नवनवे भूप्रदेश शोधून काढले. अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड या प्रदेशांत त्यांनी आपल्या वसाहती केल्या. तेथे रेड इंडियन्स, नेटिव्ह ऑस्ट्रेलिअन्स, पापुआ, मावरी या एतद्देशीय लोकांची पूर्वीपासूनच वस्ती होती. या 'एतद्देशीय' लोकांचे वंश नष्ट करण्याची त्यांनी मोहीम चालविली . १९व्या शतकातील औद्योगिक क्रांतीमुळे शहरे विकसित होऊ लागली आणि वसाहतवादी व मूलनिवासींमधील दरी वाढत गेली. 'मूलनिवासींच्या' अस्तित्व व विकासाचे प्रश्न निर्माण झाले. यातूनच जगभर मूलनिवासींची एक संघर्षशील चळवळ चालू झाली.**



## 'आदिवासी' हे मूलनिवासी असल्याचा सिद्धांत ब्रिटिशांनी मांडला

'आदिवासी' हे मूलनिवासी आहेत असा सिद्धांत ब्रिटिशांनी येथे मांडला. मूलनिवासी ही संकल्पना राजकीय व सामाजिक. वस्तुत: कोणत्याही सामाजिक, आर्थिक व राजकीय संकल्पनांचे उपयोजन वैज्ञानिक संकल्पनेप्रमाणे दुसरीकडे आहे तसे करता येत नाही. ब्रिटिशांनी मात्र उर्वरित जगात असलेली 'मूलनिवासींच्या' प्रश्नांची चौकट भारतात, आदिवासींबाबत बसविण्याचा प्रयत्न केला. संयुक्त राष्ट्र संघाच्या आकडेवारीप्रमाणे आज ७० देशांत सुमारे ३५ कोटींच्या घरात 'मूलनिवासी' राहतात. १९९३ साली 'जिनेव्हा' येथे भरलेल्या जागतिक परिषदेत मूलनिवासींच्या हक्काबद्दलचे घोषणापत्र प्रसिद्ध झाले. यांत मूलनिवासींचे मूलभूत हक्क, स्वयंनिणऱ्य, समता व स्वातंत्र्याचे अधिकार, वांशिक भेदापासून मुक्तता मिळविण्याचा हक्क, सांस्कृतिक व भाषाशास्त्राविषयीचे हक्क, आर्थिक व सामाजिक विकास, नैसर्गिक साधन संपत्ती, बौद्धिक संपदा आदी गोष्टींचा समावेश आहे.

मूलनिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी द्वितीय महायुद्धानंतर जगभर चळवळ चालू झाली. या चळवळीने मूलनिवासींसाठी सांस्कृतिक, राजकीय व पर्यावरणदृष्ट्या काही सवलती मागितल्या. याचे प्रतिबिंब संयुक्त राष्ट्र संघाच्या घोषणापत्रात दिसते. या घोषणापत्राचा जगातील काही मूलनिवासींच्या संदर्भात विचार केला तर तो कदाचित न्याय्य ठरेल. परंतु याचा अर्थ असा नव्हे की भारतासही हे घोषणापत्र जसेच्या तसे लागू होईल. कारण भारतातील अनुसूचित जमातींना 'मूलनिवासी' व उर्वरित समाजास 'आक्रमणकर्ते' म्हणून घोषित करणे हेच मुळी चुकीच्या इतिहासावर व व्यावहारिकदृष्ट्या आधार नसलेल्या मांडणीवर आधारित आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या व्याख्येतील 'मूलनिवासींची' लक्षणे किंवा मुख्य बाबींच्या संदर्भात भारतीय 'आदिवासींचा' विचार केला तर या व्याख्येत भारतीय 'आदिवासी' बसतच नाहीत. कारण येथील आदिवासी हे रामायण व महाभारत या काळापासून या देशाचे अभिन्न घटक आहेत.

आदिवासी आणि अन्य भारतवासी हे व्यापक अर्थाने समान संस्कृती, समान आस्था, समान परंपरा, समान इतिहास या सूत्रात एकमेकांशी बांधले गेले आहेत. त्यामुळे या दोहोंमध्ये मूलनिवासी व बिगर-मूलनिवासी असे कोणी वर्गीकरण केले तर ते पूर्णत: कृत्रिम व अतार्किक ठरेल. भारतातील आदिवासी आणि दलित समाजाची मुक्ती ही देशाचे विभाजन करूनच शक्य आहे, अशी आग्रही मागणी आज केली जाते. वस्तुत: आपल्या देशातील जाती-समस्या ही एक सामाजिक समस्या आहे. ही निसर्गनिर्मित वंशवाचक किंवा वांशिक समस्या नाही. भारतातील आदिवासी आणि दलित हे मूलनिवासी आहेत असा सिद्धांत व प्रचार करणाऱ्या संस्था, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाज हा वांशिकदृष्ट्या भिन्न असल्याचे कधीही म्हटले नाही, याकडे मात्र डोळेझाक करतात. वर्णभेदामुळे जाती निर्माण झाल्या, हा युरोपीय सिद्धांत बाबासाहेबांनी नाकारला. सर्व जातींची मंडळी ही एकाच वंशातील आहेत असे ते म्हणत. भारतात असंख्य जाती असल्या तरी त्यात खोलवर दडलेली सांस्कृतिक एकता आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. भारतात आज विविध प्रकारच्या जाती-जमाती आहेत. त्यांच्या भाषा-बोली, पूजापद्धती वेगवेगळ्या आहेत, परंतु या समाजघटकांची अस्मिता ही भारतीय आहे. या जमातीत काही प्रमाणात संघर्ष झाले पण त्याचे स्वरूप वंशविच्छेद किंवा संस्कृतिविच्छेद करणे असे नव्हते. जगभरच्या मूलनिवासींच्या मानवाधिकारासंबंधीचे जागरण १९४५ नंतर सुरू झाले. वसाहतवाद्यांच्या 'नव्या जगात' मूलनिवासींची ससेहोलपट सुरू झाली. घानामधील 'अकान' युरोपमधील 'सामी', ध्रुवीय प्रदेशातील 'इनुइट' व 'अलेयुटियन्स', ऑस्ट्रेलियातील 'मावरी', अमेरिकेतील 'रेड इंडियन्स' इ. मूलनिवासींना वसाहतवाद व खिश्र्चॅनिटी म्हणजेच धर्मांतरासारख्या संकटांना सामोरे जावे लागले. भारतात मात्र ही समस्या उद्भवली नाही. याचे कारण आदिवासींची संस्कृती ही या देशाच्या संस्कृतीचाच एक भाग होती व त्यांनी ती टिकवली. फरक जर काही राहिला तो फक्त त्यांच्या वास्तव्याचा व स्थानाचा. एक राहिले नागर समाजात तर दुसरे राहिले काहीशा दुर्गम अशा डोंगराळ भागात इतकेच. अमेरिका, आफ्रिका इ. देशात मूलनिवासींची स्थिती व भारतातील आदिवासींची स्थिती यात मूलभूत अंतर आहे. जगातील मूलनिवासींप्रमाणे, भारतातील आदिवासी गिरिकंदरात राहतात व दुर्गम भागात निवास असल्यामुळे भौतिक समृद्धीपासून ते वंचित राहिले हेच काय ते या दोहोंमधील साम्य. आफ्रिका, कॅनडा व उत्तर अमेरिकेत आढळणारी रंगभेद व वंशभेद यांसारख्या समस्या भारतात नाही. भारतीय घटनेने आदिवासींना सर्व नागरिकांप्रमाणेच समान स्थान व अधिकार दिले आहेत. आदिवासी हे भारतीय राष्ट्राच्या प्रवाहातीलच घटक आहेत, ते राज्यकर्तेही आहेत याचा हा पुरावा आहे. अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आदी देशांतील मूलनिवासी त्या देशावर लादल्या गेलेल्या युरोपीय जीवनधारेशी एकरूप होऊ शकले नाहीत, त्यामुळे तेथे संघर्ष झाला.

भारतातील आदिवासींनी आपली स्वत:ची जीवनशैली जपली, वेगळी राखली हे जरी खरे असले तरी प्राचीन काळापासून ते भारतीय परंपरेशी जोडलेले आहेत. आदिवासींचे देव, कहाण्या, भाषा, गाणी, धर्मजीवन, श्रद्धाविश्व, नावे, सण-उत्सव व त्यातील गाणी इत्यादी गोष्टींकडे पाहिले तर या गोष्टी येथील नागर समाजाशी मिळत्या-जुळत्याच आहेत हा प्रत्यय कोणासही येईल. उदाहरणार्थ : वारली जमातीतील पुरुष व स्त्रियांमध्ये रामजी, महादू, धर्मा, लक्ष्मी, नवशी (नवसाने झालेली) ही नावे आढळतात. आदिवासी हे दसरा, दिवाळी, संक्रांत व होळी यांसारखे सण साजरे करतात. डॉ. जी. एस. धुर्ये यांनी 'गॉड आणि मेन' असे पुस्तक लिहिले आहे त्यातही त्यांनी अरण्यात राहणाऱ्या जनजाती या हिंदूच आहेत, असा निष्कर्ष काढला आहे. डॉ. इरावती कर्वे यांनीही आपल्या संशोधनातून हे सिद्ध केले आहे.

इंग्रज येण्याअगोदर भारतात मूलनिवासी, आदिवासी या संकल्पनाच अस्तित्वात नव्हत्या. ब्रिटिश आल्यानंतरच भारतीयांना या संकल्पनांचा परिचय झाला व त्या इथे थोपविण्यात आल्या. वास्तविक पाहता इथे कोणीच मूलनिवासी नाहीत वा कोणी आक्रमक नाहीत. त्यामुळे ब्रिटिशांनी अमेरिका वा आफ्रिकेतील मूलनिवासींसाठी लावलेली फूटपट्टी येथील समाजास लावणे अवैज्ञानिक आहे. भारतातील दलित व जंगलदऱ्यांत राहणारे आपले हे समाजबांधव वांशिकदृष्ट्या व सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न नाहीत. त्यामुळे इथे 'मूलनिवासी' व 'बिगरमूलनिवासी' असा भेदाभेद गर ठरतो.

आदिवासी हा एखाद्या मानवी संग्रहालयात ठेवण्याची प्रदर्शनीय वस्तू नाही, तर तो इथल्याच भारतीय समाजाचा जिवंत घटक आहे. तथाकथित 'आदिवासी' हा आपला समाजबांधव आहे. हे नागर समाजाने मानसिकदृष्ट्या समजून घेतले पाहिजे. आदिवासी समाजास शिक्षित करणे, त्यास विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे ही काळाची आवश्यकता आहे. वेगवेगळ्या समाजघटकांना स्वीकार आणि समन्वय या तत्त्वांच्या आधारे एका समान सूत्रात गुंफणे ही भारतीय संस्कृतीची विशेष परंपरा आहे. त्यामुळे समाजाचा आदिवासी, बिगर-आदिवासी असा खंडित विचार न करता एकात्मिक विचार केला पाहिजे, यातच देशाचे हित आहे.

# बेकायदा बांधकाम जमीनदोस्त

**नवी मुंबई-** कोणताही विकास परवाना न घेता खारघर-तळोजा नोड्स येथे केलेले अनधिकृत बांधकाम सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण



पथकाने गुरुवारी जमीनदोस्त केले. तळोजा गाव येथील राष्ट्रीय महामार्ग ४लगत अनधिकृतरीत्या उभारण्यात आलेले सुमारे १०० व्यापारी गाळे निष्कासित करून अंदाजे दोन हजार चौरस मीटर क्षेत्र मुक्त करण्यात आले. खारघर-तळोजा येथील सेक्टर ४९, सर्व्हे क्र. ९८ ए येथे सिडकोच्या मलनि:सारण वाहिनीला अडथळा ठरणारा बाघबान इंग्लिश स्कूलचा अनधिकृत वर्ग आणि भिंत पाडण्यात आली. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील तुर्भे व घणसोली येथील अनधिकृत बांधकामेही पालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागाने जमीनदोस्त केली. यामध्ये तुर्भे विभागांतर्गत सेक्टर १९ ई शिवम कॉम्पलेक्स येथे टेरेसवर अनॉधिकृत हुक्का पार्लर चालू होता. या ठिकाणी अनधिकृत वाढीव बांधकाम व पत्रा शेड उभारले होते. हरपिंक सिंग यांनी केलेल्या या अनधिकृत बांधकामास नोटीस बजावल्यानंतर पालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागाने बांधकाम पाडून ३० हजार रुपयांचा दंड वसूल केला.

# विमान उड्डाणाला आणखी दोन वर्षे

## नवी मुंबई विमानतळासंदर्भातील ३२ अटी पूर्ण करण्यास विलंब

**नवी मुंबई-** जमीन संपादन, विमानतळपूर्व कामे, धावपट्टी आणि टर्मिनल इमारत कामाची मुख्य निविदा, भूमिपूजन, सामंजस्य करार ही सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतरही नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरील पहिले उड्डाण हे २०२० शिवाय होण्याची शक्यता कमी असल्याची चर्चा सिडकोत सुरू आहे. पर्यावरण मंत्रालयाची परवानगी मिळविताना सिडकोने सुमारे ३२ अटी पूर्ण करण्याची तयारी दर्शवली होती. त्या अटी पूर्ण करण्याची हमी दिल्यानंतर सिडकोला दुसरी पर्यावरण परवानगी मिळाली आहे, पण ती कामे प्रत्यक्षात अद्याप सुरू झालेली नाहीत. त्याचप्रमाणे या प्रकल्पात नष्ट होणारे कांदळवन व वृक्षसंपदेला पर्यायी झाडे लावण्यात आलेली नसल्याने पर्यावरण प्रेमींनी न्यायालयात धाव घेतली आहे. प्रकल्पग्रस्तांचे १०० टक्के स्थलांतरही झालेले नाही. या सर्व अडचणींमुळे उड्डाणास विलंब होण्याची चर्चा आहे.




नुकत्याच झालेल्या संसदीय अधिवेशनात नवी मुंबईतील विमानतळावरून २०१९ पर्यंत पहिला टेक ऑफ होईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. फेब्रुवारीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. त्या वेळीही या विमानतळावरून २०१९ पर्यंत पहिले उड्डाण होईल, असे जाहीर करण्यात आले होते, मात्र हे शक्य नाही असे सिडको अभियंत्यानी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

नागरी उड्डाण राज्यमंत्री जयंत सिन्हा यांनीही यापूर्वी केलेल्या हवाई पाहणी दौऱ्यानंतर हे विमानतळ २०१९ पर्यंत सुरू करणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यांनी तर २०२२ पर्यंत या विमानतळावरून विमान उडविणे शक्य होणार नाही असे म्हटले आहे. सिडकोने आतापर्यंत कोणताही मोठा प्रकल्प वेळेत पूर्ण केलेला नाही. यात वाशी-पनवेल, ठाणे-तुर्भे रेल्वे, नेरुळ-उरण रेल्वे प्रकल्पांचा समावेश आहे.

# वसई-विरारमध्ये वर्षभरात १० हजार श्वानदंश


**वसई-विरार शहरात श्वानांचा उपद्रव वाढला असून २०१७ या वर्षात शहरात तब्बल १० हजार श्वानदशांच्या घटना घडल्याची नोंद महापालिकेने केली आहे. श्वानांचा उपद्रव रोखण्यासाठी पालिकेला निर्बीजीकरण आणि श्वानदंशावरील लशींसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करावा लागत असल्याची बाब समोर आली आहे. गेल्या तीन वर्षात पालिकेने श्वानदंशावरील लशींसाठी १ कोटी ६८ लाख रुपये तर श्वान निर्बीजीकरणासाठीही १ कोटींहून अधिक खर्च केला आहे. कोट्यवधींचा खर्च करूनही श्वानदंशाच्या घटना वाढत असल्याने हा खर्च वाया गेला आहे.**

वसई-विरार शहरात भटक्या श्वानांचा उपद्रव वाढलेला आहे. श्वानांमुळे नागरिकांना विविध त्रासाला सामोरे जावे लागत आहे. २०१७ या वर्षात शहरात तब्बल १० हजार श्वानदशांच्या घटना घडल्याचे पालिकेच्या आरोग्य विभागाने म्हटले आहे. दररोज सरासरी ३० आणि महिन्याला सुमार ९०० श्वानदंशाच्या घटना घडत असतात. श्वानदंशाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्या तरी त्यावरील लसी पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचे पालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र चौहान यांनी सांगितले. पालिकेकडे सध्या नालासोपारा येथे ८० खाटांचे तुळींज रुग्णालय आणि वसईत सर डी. एम. पेटीट अशी दोन रुग्णालये आहेत. याशिवाय २१ आरोग्य केंद्र, नऊ दवाखाने, दोन माता बालसंगोपन केंद्र आहेत. या सर्व ठिकाणी श्वानदशांवरील




लशींचा पुरेसा साठा असल्याची माहिती त्यांनी दिली. वाढत्या श्वानदंशाच्या घटनांमुळे श्वानदंशावरील लसींवर पालिकेला खर्च करावा लागात आहे. गेल्या तीन वर्षांत महापालिकेने श्वान लशींसाठी १ कोटी ६८ लाख रुपये खर्च केला आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेंतर्गत निर्बीजीकरण करताना श्वानांना अँटीरेबीज लस दिली जाते, तर वैद्यकीय आरोग्य व्यवस्थेंतर्गत श्वानदंश झालेल्यांना लस दिली जाते, असे डॉ. चौहान यांनी सांगितले. महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार गेल्या तीन वर्षांत १० हजार २५५ श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे.

# कल्याण, डोंबिवलीत प्रदूषणाची धोक्याची घंटा



**कल्याण-** आधारवाडी कचराभूमीवर लागणाऱ्या आगी, औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांतून सोडले जाणारे वायू, वाहनांची वाढती वर्दळ अशा विविध कारणांमुळे कल्याण, डोंबिवली शहरांतील प्रदूषणाने वरची पातळी गाठण्यास सुरुवात केली आहे. प्रदूषित शहरांच्या यादीत नेहमीच आघाडीवर असलेली या दोन्ही शहरांतील हवेची प्रतवारी वर्षांचे बाराही महिने वाईट असल्याचे दिसून येते. त्यातही मार्चच्या शेवटच्या आठवड्यात आणि एप्रिलच्या पहिल्या आठवड्यातही कल्याणमधील हवेतील प्रदूषणाचा निर्देशांक २७४ अर्थात अत्यंत धोकादायक पातळीवर पोहोचल्याचे स्पष्ट होत आहे. कल्याणे, डोंबिवली शहरांतील औद्योगिक क्षेत्र, दिवसेंदिवस वाढत जाणारी वाहतूक आणि बांधकामांमुळे शहरातील हवेची पातळी घसरत चालली आहे. या पट्ट्यात अनेक रासायनिक कारखाने असून तेथून बाहेर सोडले जाणारे वायू हवेत मिसळून हवेची गुणवत्ता ढासळवत आहेत. याबाबत गेल्या काही वर्षांपासून पर्यावरणप्रेमी सातत्याने ओरड करत असतानाच, कचराभूमीवर लागणाऱ्या आगींनी शहरवासीयांची चिंता आणखी वाढवली आहे. मार्च महिन्यात आधारवाडी कचराभूमीला लागलेल्या आगीमुळे कल्याणच नव्हे तर डोंबिवलीतील प्रदूषणाची पातळी वाढल्याची माहिती हाती येत आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून या दोन्ही शहरांमधील हवामानाची पातळी नियमीतपणे मोजली जाते. डोंबिवली येथील पिंपळेश्वर मंदिर येथे हवेतील प्रदूषके मोजण्याची यंत्रणा कार्यान्वित असून त्यातून मिळणारी माहिती थेट संकेतस्थळावर पाठवली जाते. या माहितीनुसार, या दोन्ही शहरांमधील धुलिकणांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले असून आधारवाडी कचराभूमीला लागलेल्या आगीमुळे प्रदूषणाची पातळी वाढली असल्याचे स्पष्ट होत आहे.

# शिवसेनेचा बालेकिल्ला पोखरण्यासाठी भाजपची राज ठाकरेंना टाळी



**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भाजपला कडवा विरोध करताना भाजपच्या धोरणावर कडाडून टीका केली. मात्र, राज यांची राजकीय खेळी वेगळी असल्याचे चित्र दिसून आले. राज्यात नगरपंचायत निवडणुकीत भाजप आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती झाल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे भाजपने राज ठाकरे यांच्या मनसेला टाळी दिल्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात देवरुख नगरपंचायत निवडणुकीत भाजप आणि मनसे युती झाल्याचे पाहायला मिळाले. या निवडणुकीत मनसेनेने आपले खाते उघडले. देवरुख नगरपंचायतीमध्ये आता मनसेचा एक नगरसेवक असणार आहे. तसेच भाजपने ही निवडूक जिंकून शिवसेनेला जोरदार धक्का देत पुन्हा ही नगरपंचायत आपल्याकडे राखण्यात यश मिळविलेय. त्यामुळे भाजप-मनसे युतीमुळे मनसेला नगरपंचायतीमध्ये सत्तेत स्थान मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### राजकारणातील नवी समीकरणे

**प्रभाग १२ मधून मनसेच्या उमेदवार सान्वी संसारे (मनसे) २२९ यांनी शिवसेनेच्या उमेदवार दीक्षा शेट्ये (१५७) यांचा पराभव केला. या ठिकाणी भाजपने आपला उमेदवार दिला नव्हता. तसेच काँग्रेसच्या रिया शेट्ये (२९) आणि अपक्ष सोनिया धामणसकर (१३०) रिंगणात होत्या. भाजप-मनसे युतीमुळे येथे शिवसेनेला जोरदार धक्का देण्यात भाजप यशस्वी झाले. तसेच भाजपला विजय मिळवून देण्यात मनसेचा हातभार लागल्याने राजकारणातील नवी समीकरणे देवरुख नगरपंचायतीमध्ये दिसून आलीत.**

# परप्रांतीय भाजीविक्रेत्यांसाठी मराठी शेतकऱ्यांना त्रास!



**मुंबई** - महापालिका व पोलिसांकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक व हप्तेबाजी हा परप्रांतीय फेरीवाले व भाजीविक्रेत्यांच्या साटेलोट्याचा परिणाम असल्याचा आरोप मुंबईबाहेरून येणाऱ्या मराठी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. हे प्रकरण पालिका अधिकाऱ्यांवर शेकण्याची शक्यता दिसू लागताच पालिका प्रशासनाकडून सारवासारवीचे प्रयोग सुरू झाले असून हप्तेखोर पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी आयुक्त अजोय मेहता यांच्याकडे पाठपुरावा करू असे महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी सांगितले. हप्तेखोरीच्या विरोधात मनसेनेही दंड थोपटले असून पालिका अधिकाऱ्यांना धडा शिकवू असे मनसेचे प्रवक्ते संदीप देशपांडे यांनी सांगितले.

राज्य सरकारनेच शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ मिळावी यासाठी संपूर्ण मुंबई व ठाण्यात आठवडाबाजार सुरु करण्यास परवानगी दिली होती. सुरुवातीच्या काळात भाजपच्या नेत्यांनी तसेच शिवसेनेने उत्साहाने आपापल्या मतदारसंघात आठवडा बाजार सुरु केले.

मुंबईत अनेक ठिकाणी हे आठवडा बाजार नियमितपणे भरू लागल्यानंतर स्थानिक परप्रांतीय भाजीविक्रेत्यांना त्याचा फटका बसू लागल्यामुळे पालिका व पोलीस अधिकाऱ्यांना हाताशी धरून त्यांनी आठवडा बाजारासाठी येणाऱ्या राज्यातील शेतकऱ्यांना त्रास देण्यास सुरुवात केल्याच्या तक्रारी यापूर्वीही पालिका आयुक्त अजोय मेहता यांच्याकडे केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

बोरिवली येथे उस्मानाबाद येथून आलेल्या शेतकऱ्यांना महापालिकेच्या व पोलिसांच्या अधिकाऱ्यांकडून हप्ता मिळावा यासाठी सतत छळवणूक होत होती. यामागे स्थानिक परप्रांतीय भाजीविक्रेत्यांचे संगनमत असल्याचे या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पालिका व पोलिसांच्या छळवणुकीला कंटाळून या शेतकऱ्यांना आपली भाजी मंत्रालयाच्या दारात फेकली. त्यानंतर मरीन लाईन्स पोलिसांनी या शेतकऱ्यांना ताब्यात घेतले.

याप्रकरणी अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोजकुमार शर्मा यांना विचारले असता बोरिवली येथे पालिका व पोलीस अधिकाऱ्यांनी आठवडा बाजारात भाजीविक्री करण्यास मनाई केल्याची या शेतकऱ्यांची तक्रार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पालिका अधिकाऱ्यांनी पैशासाठी अडवणूक केली का व आठवडाबाजाराची जागा नेमकी कोठे होती व तेथेच हे शेतकरी विक्रीसाठी भाजी घेऊन गेले का, याची चौकशी केली जाईल, असे मनोज कुमार शर्मा यांनी सांगितले.

बोरिवली येथे शेतकऱ्यांना आठवडाबाजाराठी जागा उपलब्ध करून द्यावी म्हणून मनसेचे स्थानिक पदाधिकारी हेमंत कांबळे हे या शेतकऱ्यांना घेऊन सहाय्यक पालिका आयुक्तांकडे गेले असता सरकारचे कोणतेही अधिकृत आदेश आमच्याकडे नसल्याचे कांबळे यांनी सांगितले, असे संदीप देशपांडे यांचे म्हणणे आहे.

# चहा-नाश्त्यावर एक कोटींचा खर्च



***नवी दिल्ली: महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस सरकारचा चहा घोटाळा गाजत असतानाच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या कार्यालयात गेल्या तीन वर्षात चहा-नाश्त्यावर एक कोटी रुपयांचा खर्च करण्यात आल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. त्यामुळे विरोधकांनी केजरीवाल सरकारवर टीकेची झोड उठवली आहे.***

आरटीआय कार्यकर्ते हेमंतसिंह गौनिया यांना मिळालेल्या माहितीच्या अधिकारातून ही धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. केजरीवाल यांच्या कार्यालयात गेल्या तीन वर्षात चहा-नाश्त्यावर १.०३ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती माहितीच्या अधिकारातून उघड झाली आहे. २०१५-१६ या आर्थिक वर्षात चहा-नाश्त्यावर २३.१२ लाख रुपये, २०१६-१७ मध्ये ४६.५४ लाख रुपये आणि २०१७-१८ मध्ये ३३.३६ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. २०१६ मध्ये खर्च झालेल्या ४७.२९ लाख रुपयांपैकी २२,४२,३२० लाख रुपयांचं बिल त्यांच्या सचिवालयातील कार्यालयाचं असून २४,८६,९२१ रुपये बिल त्यांच्या कॅम्प ऑफिसचं असल्याचं उघड झालं आहे. मात्र त्यावर मुख्यमंत्री कार्यालयातून कोणतंही उत्तर देण्यात आलेलं नाही.

दरम्यान, उत्तराखंडचे मुख्यमंत्री त्रिवेंद्र सिंह रावत यांच्या कार्यालयातही अशाच प्रकारचा एक आरटीआय टाकण्यात आला होता. त्यावेळी गेल्या १० महिन्यात चहा-नाश्त्यावर ६८ लाख रुपये खर्च करण्यात आल्याचं उत्तर मुख्यमंत्री कार्यालयातून देण्यात आलं होतं. तर २०१६ मध्ये उत्तर प्रदेशातील तत्कालीन समाजवादी पार्टीच्या सरकारने चार वर्षात चहा-नाश्त्यावर ९ कोटी रुपये खर्च केल्याचं उघड झालं होतं.

# राज्यात धावणार एसटीच्या नॉन एसी स्लीपर बस



**मुंबई - 'विनावातानुकूलित स्लीपर (नॉन एसी स्लीपर) बसची नोंदणी आणि वाहतूक करण्यासाठी एसटी महामंडळाला शासनामार्फत आधीच परवानगी देण्यात आली आहे, अशी परवानगी खासगी वाहनांना देण्यात आलेली नाही. त्यामुळे याबाबतीत एसटी महामंडळाचा एकाधिकार असून लोकांच्या सेवेत लवकरच एसटीच्या विनावातानुकूलित स्लीपर बस दाखल होतील, असे परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी सांगितले.**

# संभाजी भिडे गुरुजींविरोधात आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल



**बेळगाव** – शिवप्रतिष्ठानचे प्रमुख संभाजी भिडे गुरुजींवर आचारसंहिता भंग करण्याच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येळ्ळूर येथील महाराष्ट्र मैदानावर प्रक्षोभक वक्तव्ये केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याबाबत निवडणूक आयोगाने पोलिसात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. संभाजी भिडे गुरुजी म्हणाले की, मी अनेक कुस्तीची मैदाने पाहिली पण येळ्ळूरचे महाराष्ट्र मैदान देशातील एक अव्वल दर्जाचे मैदान आहे. जो माजी आमदार महाराष्ट्र मैदान उद्ध्वस्त करू पाहत होता त्याला त्याची जागा दाखवून द्या असे आवाहन त्यांनी केले होते. तसेच महाराष्ट्र एकीकरण समितीच्या उमेदवाराला निवडून द्या, असं आवाहनही त्यांनी यावेळी केले. भिडे गुरूजींनी केलेल्या या वक्तव्यांमुळे आचारसंहिता भंग झाल्याची तक्रार त्यांच्याविरोधात करण्यात आली होती.






# नोकरदारांप्रमाणे विद्यार्थ्यांनाही बायोमेट्रिक हजेरी, विनोद तावडेंची घोषणा



**मुंबई:** मित्र कॉलेजमध्ये गैरहजर असतानाही, त्याच्या नावाची हजेरी देऊन, म्हणजेच प्रॉक्सी लावणाऱ्यांना आता कायमचा चाप बसणार आहे. कारण कनिष्ठ महाविद्यालयात बायोमेट्रिक अटेंडन्स अनिवार्य करणार असल्याची घोषणा शिक्षण मंत्री विनोद तावडेंनी केलीय.

दहावीच्या नवीन अभ्यासक्रमासंदर्भात मुंबईच्या दादरमध्ये पार पडलेल्या चर्चासत्राच्या कार्यक्रमात विनोद तावडे बोलत होते. दरम्यान १३०० शाळा बंद करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर टीका करणाऱ्यांना विनोद तावडेंनी उत्तर दिलं. विनोद तावडेंचा रोख शरद पवार आणि त्यांची कन्या सुप्रिया सुळे यांच्यावर होता.

ज्युनियर कॉलेजमध्ये बायोमेट्रीक अटेंडन्स कंपल्सरी करणार असल्याचं शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी सांगितलंय. सध्या जवळपास राज्यातील तीस लाख विद्यार्थी कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत आहेत. काही वर्षांपूर्वी पटसंख्येची गणना झाली असताना अनेक विद्यार्थी गैरहजर असल्याची बाब समोर आली होती. मुलांची जहेरी वाढवण्यासाठी तसंच बोगस कॉलेजेसला आणि विद्यार्थ्यांना चाप बसवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

# मेट्रो ३ला २०२१चा मुहूर्त




**प्रकल्पाच्या मार्गातील वृक्षतोडीस मनाई, रात्री काम न करण्याबाबचे न्यायालयीन आदेश, प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन, जल-विद्युत आदी वाहिन्यांचे स्थलांतरण आणि सामाजिक संस्था किंवा लोकांकडून सातत्याने येणारे अडथळे यामुळे सुमारे २३ हजार कोटी रुपये खर्चाच्या आणि ३३ किमी लांबीच्या कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पाच्या पूर्णत्वाची पूर्वघोषित मुदत हुकणार असून प्रकल्पाचे काम काही महिने लांबणार आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या किमतीतही वाढ होणार असल्याची कल्पना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने राज्य सरकारला दिली आहे.**

दक्षिण मुंबई- वांद्रे- कुर्ला संकुल, आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिप्झ व मरोळ औद्योगिक वसाहत या महत्त्वाच्या केंद्रांना जोडणाऱ्या मेट्रो-३ प्रकल्पाचे काम काही महिन्यांपासून सुरू आहे. मात्र या प्रकल्पाच्या कामात येणाऱ्या अडथळ्यांची मालिका अद्याप संपलेली नाही. पूर्वीच्या नियोजनानुसार मे २०२०मध्ये या प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन डिसेंबर, २०२०मध्ये प्रत्यक्ष मेट्रो मुंबईकरांच्या सेवेत धावणार होती. मात्र रात्रीचे काम करण्यास न्यायालयाने घातलेली बंदी तसेच वृक्षतोडीस परवानगी देण्याच्या आयुक्तांच्या अधिकारावरही आलेली न्यायालयीन बंदी यामुळे मेट्रो मार्गातील तसेच कारशेडसाठी लागणाऱ्या जागेवरील वृक्ष तोडीस अडचणी आल्या आहेत. त्यामुळे प्रकल्पाचे काम किमान वर्षभर पुढे जाण्याची शक्यता आहे.

प्रकल्पाचा कालावधी वाढल्यामुळे या प्रकल्पाच्या किमतीत सुमारे एक हजार कोटींनी वाढ होण्याची शक्यता आहे. मेट्रो रेल कार्पोरेशनने याबाबतची कल्पना राज्य आणि केंद्र सरकारला दिल्याचे सूत्रांनी सांगितले. याबाबत एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्याशी संपर्क साधला असता, प्रकल्पाच्या कामात येणाऱ्या अडचणींमुळे काही महिने काम वाढणार असले तरी नेमके किती महिने लांबणीवर पडेल हे आत्ताच सांगता येणार नाही. मात्र काम लांबल्यामुळे खर्चात काही प्रमाणात वाढ होऊ शकते असे त्यांनी सांगितले.

### विलंबाची कारणे

- प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन
- जल, वीज, सांडपाणी, दूरध्वनीच्या आदींच्या वाहिन्या-तारा इतरत्र हलविणे
- प्रकल्पाच्या आड येणाऱ्या वृक्षांच्या छाटणीच्या प्रकरणावरून कामाला उच्च न्यायालयाकडून तीन महिने मिळालेली स्थगिती
- रात्रीच्या वेळी कामावर आलेली बंदी


## आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com





हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)